RNI No. MAHBIL/2009/31733
Reg. No. MH/MR/South-322/2010-12

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग चार-अ

वर्ष ३, अंक ५५] शनिवार, डिसेंबर ३, २०११/अग्रहायण १२, शके १९३३ [पृष्ठे ३
किंमत : रुपये १२.००

## असाधारण क्रमांक ९६

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**

मंत्रालय विस्तार इमारत, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ३ डिसेंबर २०११

**अधिसूचना**

**ऊस (नियंत्रण) आदेश, १९६६.**

क्रमांक ससाका. २०११/प्र.क्र. २१ (भाग-१)/१३ स.– ज्याअर्थी, अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ (१९५५ चा १०) च्या कलम ३ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, केंद्र सरकारने काढलेला ऊस (नियंत्रण) आदेश, १९६६ याच्या खंड ६ क मध्ये अशी तरतूद केली आहे की, राज्यातील कोणताही विद्यमान साखर कारखाना किंवा दुसरा नवीन साखर कारखाना यांच्या १५ कि.मी. च्या त्रिज्येमध्ये कोणत्याही नवीन साखर कारखान्याची उभारणी करता येणार नाही ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त खंड ६ क च्या परंतुकान्वये, राज्य शासनाला, केंद्र सरकारच्या पूर्वमान्यतेने, किमान १५ कि.मी. पेक्षा अधिक असे अंतर अधिसूचित करण्याचा अधिकार प्रदान करण्यात आलेला आहे ;

**आणि ज्याअर्थी,** विद्यमान साखर कारखाने वर्धनक्षम होण्याची सुनिश्चिती करण्यासाठी आणि तसेच उसाच्या पिकाचा दीर्घकाळ पुरवठा होण्याची सुनिश्चिती करण्यासाठी, महाराष्ट्र शासनाला, विद्यमान साखर कारखाना आणि उभारावयाचा नवीन कारखाना यांच्यामधील किमान अंतर २५ कि.मी. इतके असेल अशी तरतूद करणे इष्ट वाटते ;

**त्याअर्थी, आता,** उक्त खंड ६ क च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, केंद्र सरकारच्या पूर्वमान्यतेनंतर, याद्वारे, असा निदेश देत आहे की, कोणताही विद्यमान साखर कारखाना किंवा दुसरा नवीन कारखाना यांच्या २५ कि.मी. च्या त्रिज्येमध्ये कोणताही नवीन साखर कारखाना उभारला जाणार नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**राजगोपाल देवरा,**

शासनाचे सचिव.

**CO-OPERATION, MARKETING AND TEXTILES DEPARTMENTS**

Mantralaya Annexe Building, Madam Cama Road,
Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032,
dated the 3rd December 2011

*NOTIFICATION*

SUGARCANE (CONTROL) ORDER, 1966.

No. SSK. 2011/C. R. 22(part 1)/13 C.—Whereas, clause 6A of the Sugarcane (Control) Order, 1966, issued by the Central Government, in exercise of the powers conferred by section 3 of the Essential Commodities Act, 1955 (10 of 1955), provides that no new sugar factory shall be set up within the radius of 15 kms of any existing sugar factory or another new sugar factory in a State ;

And whereas, under the proviso to the said clause 6A, the State Government is empowered, with prior approval of the Central Government to notify such minimum distance higher than 15 kms ;

And whereas, with a view to ensure viability of the existing sugar factories and also with a view to ensure long term sustenance of the sugarcane crop, the Government of Maharashtra, considers it expedient to provide that the minimum distance between the existing sugar factory and the new factory to be setup shall be 25 kms ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by the proviso to the said clause 6A, the Government of Maharashtra, after prior approval of the Central Government hereby directs that no new sugar factory shall be set up within a radius of 25 kms. of any existing sugar factory or another new factory.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAJAGOPAL DEVARA,
Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.